# मेट्रो-3 मार्गिकेची माहिती मिळणार आता व्हीडीओच्या माध्यमातून

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-बांद्रा- सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या भुयारीकरणाच्या तेराव्या टप्प्याचे काम नुकतेच पूर्ण झाले असून या संपूर्ण मार्गिकेची माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे. या प्रकल्पाबाबतची संपुर्ण माहिती देणारा व्हिडीओ मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) नुकताच जारी केला आहे.

संपूर्णपणे जमिनीखालून जाणाऱ्या मेट्रो-३ मार्गिकेवर एकूण २७ स्थानके असतील. संपूर्ण मार्गिकेवरील एकूण ५२ किलोमीटर भुयारीकरणापैकी २६.१५ किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाल्याचे मेट्रो-३ च्या अधिकाऱ्यांनी सांगितले. भुयारीकरणासाठी सध्या १७ टनेल बोरिंग मशिन (टीबीएम ) यंत्रे कार्यरत आहेत. टीबीएम यंत्रे



जमिनीच्या आत उतरवण्यासाठी मार्गिकेवरील सात ठिकाणी मोठी विवरे (लाँचिंग शाफ्ट) खोदण्यात आली आहेत.

या प्रकल्पात स्टील डेकिंगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. कनेक्टिंग द अन कनेक्टड या टॅगलाईन सहित मेट्रोचे काम सुरु आहे. मे महिन्यापूर्वी नालेसफाईचे काम अत्यंत वेगाने सुरु असून, या कामामुळे मुबई तुंबण्याचे प्रमाण कमी होईल, असेही एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले.